# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## पुणे येथील ससून रुग्णालयातील न्यायवैद्यकशास्त्र विभाग प्रमुख शवविच्छेदन अहवाल देण्याबाबत

**(१) १५०५८ (२६-०८-२०२२) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात तसेच पुणे शहर व त्यालगतच्या परिसरात प्राणांतिक उपोषण, खुनाचे गुन्हे वा एखाद्या नागरिकांच्या अकस्मात मृत्यू, अशा प्रकरणात पोलीस तपासाचेदृष्टीने शवविच्छेदनाचा अहवाल वेळेवर मिळणे आवश्यक असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथील ससून रुग्णालयातील न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. नरेश झंझाड हे शवविच्छादनाचे अहवाल देण्यासाठी प्रकरणाची तातडी जाणून त्यासाठी रुपये १०० ते २०,००० पर्यंतच्या रक्कमेची मागणी पुणे पोलिसांकडे करीत असल्याचे वा अन्यथा शवागार “अहवाल तयार नाही किंवा त्रुटींची कारणे सांगून अहवाल देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे दिनांक ६ डिसेंबर,२०२१ रोजी व त्यानंतर वेळोवेळी निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याप्रकरणी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने, पुणे महानगरपालिकेचे मा.विरोधी पक्षनेता यांचे दिनांक २१ एप्रिल, २०२२ च्या, पोलीस उपआयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांचे दिनांक २३ मे, २०२२ च्या पत्रान्वये मा.सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय व मा.आयुक्त वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई तसेच मा.तत्कालीन उपमुख्यमंत्री यांना तक्रार निवेदने देऊन त्याद्वारे संबंधित न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुखांविरुध्द कारवाई करण्याबाबत मागणी करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पत्राधिन मागणीसंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०२४) :** (१) होय,

(२) व (३) होय, डॉ. एन.पी. झंझाड हे नेहमीच मयताचे इंटरनल किंवा एक्स्टरनल जखमांचे कारण सांगून पैशाची मागणी करून पोलीसांची विनाकारण अडवणूक करत असतात ही वस्तुस्थिती आहे.

शवविच्छेदन अहवालाकरीता रुपये १०० ची मागणी आणि पैसे न दिल्यास अहवाल तयार नसल्याचे कारण सांगून किंवा किरकोळ त्रुटी नमूद करून अहवाल देण्यात नकार देत असल्याने गुन्हे व अकस्माक मृत्यूची प्रकरणे प्रलंबित राहत असल्याने डॉ. एन.पी. झंझाड यांचेबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस स्टेशन, पुणे यांनी दिनांक ०६/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, पुणे यांना अहवाल सादर केला आहे.
डॉ. एन.पी. झंझाड यांचेवर योग्य त्या कठोर कारवाई करीता सदर अहवाल पोलीस उप आयुक्त (गुन्हे), पुणे यांच्या दिनांक २३/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये वैद्यकीय अधिकारी तथा अधिष्ठाता, ससून हॉस्पिटल, पुणे यांना पाठविण्यात आला आहे.
(४) डॉ. एन.पी. झंझाड, प्रोफ़ेसर ॲण्ड हेड ऑफ डिपार्टमेंट ऑफ फॉरेन्सिक ॲण्ड टॉक्सिकॉलॉजी, ससून हॉस्पीटल, पुणे यांचेविरुध्द आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत विभागीय चौकशी करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात क्रिकेट खेळावर सट्टा बाजार वाढला असणेबाबत

**(२) १९३९८ (०४-०८-२०२३) श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात क्रिकेट खेळावर सट्टा बाजार वाढला असल्याचे मे. २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकारामुळे जुगारात हरलेल्या एका मुलाने आत्महत्या केली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकारावर आळा घालण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) अमरावती जिल्ह्यात क्रिकेट खेळावर सट्टा लावल्याने पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रात माहे एप्रिल, २०२३ मध्ये एकूण ३ तर पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे कार्यक्षेत्रात मे, २०२३ मध्ये एकूण ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) सन २०२३ (जानेवारी ते ऑगस्ट) मध्ये पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण तसेच, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे कार्यक्षेत्रात क्रिकेट सट्ट्यामध्ये हरल्यामुळे आत्महत्या केल्याबाबत प्रकरण नोंद नाही.
(३) पोलीस स्टेशन हद्दीत लपून-छपून क्रिकेट सट्टा चालविणाऱ्यांवर लक्ष ठेवून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. क्रिकेट सट्टा बाबतची माहिती प्राप्त करून, त्यांचेवर विशेष पथकामार्फत छापे टाकून वेळोवेळी कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मा.उच्च न्यायालयाने गायरान धारकांच्या अतिक्रमण केलेल्या जमिनी निष्कातीत  करण्याच्या मागणीबाबत

**(३) १९५९६ (०८-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १५१२२ ला दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गायरान जमिनीवर गेली ४० ते ४५ वर्षे लाभार्थी कायमस्वरुपी राहत असणाऱ्यांना अतिक्रमणधारक ठरवून त्यांना महसूल विभागामार्फत नोटिसा बजावण्यात आल्याचे माहे मे,२०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले असून सदर नोटीसीला नागरिकांनी जाहीर निषेध करुन लाभार्थ्यांना त्यांची हक्कांची घरे कायमस्वरुपी नावावर होईपर्यंत निवडणूकांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने गायरान धारकांच्या अतिक्रमण केलेल्या जमिनी निष्कासित करण्याच्या दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने पुनर्विचार याचिका दाखल करुन न्याय मिळवून देण्याच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात उपोषण केले असून उपोषणकर्त्यांनी १९७८ व १९९० प्रमाणे २०२३ पर्यंत कसत असलेल्या गायरान जमिनी नावावर होण्याकरता नव्याने अध्यादेश काढण्यासह इतर मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात "गायरान जमिनींवरील भूमिहीन, अनुसूचित जाती/ जमातीतील घटकांची घरकुले हटवू नयेत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या असून राज्य शासन मा.न्यायालयात भूमिका मांडेल", तसेच आवश्यक असलेल्या अतिक्रमणाला शासकीय दराप्रमाणे आकारणी करुन नियमित करण्याबातचा शासन निर्णय जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन मा.महसूल मंत्री महोदयांनी विधानपरिषदेत दिले होते, तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भूमिहीनांची अतिक्रमणे मा.न्यायालयीन आदेशातून वगळण्याची विनंती करणारी पुनर्विचार याचिका शासनाने तात्काळ दाखल करावी, अशी मागणी मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा यांनी त्यांच्या दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणधारकांना संबंधित तहसिलदारांकडून नोटिसा पाठविण्यात आल्या असून एका महिन्यात कागदपत्रे आणि म्हणणे सादर करण्याचे आदेश माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गायरान जमिनीवरील अतिक्रमणाबाबत शासन निर्णय घेणार असताना सातारा जिल्ह्यातील मौजे निगडीवंदन, अंगापूर उर्फ तारगांव, अंगापूर वंदन, फडतरवाडी तसेच कोरेगांव (जि.सातारा) तालुक्यातील अतिक्रमणधारकांना गायरान जमिनीवरील ताबा देण्यासंदर्भात नोटीसा बजावले असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गायरान जमिनी नावावर होण्याच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.
(५) होय.

सातारा व कोरेगांव तालुक्यातील अनुक्रमे ५३० व १५४० गायरान जमिनीवरील अतिक्रमण धारकांना नोटीस बजावणेत आलेल्या आहेत.
(६) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग दिनांक १६/०२/२०१८ व दिनांक २२/०८/२०२२ तसेच, शासन निर्णय, नगरविकास विभाग दिनांक १७/११/२०१८ मधील तरतुदीनुसार पात्र असलेली अथवा शासनाच्या यापूर्वीच्या इतर कोणत्याही धोरणांनुसार / तरतुदीनुसार संरक्षित असलेली अतिक्रमणे कार्यवाहीतून वगळण्यात यावीत, अशी भूमिका मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राव्दारे मांडण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट आहे.

---

## मुंबईतील खार (पश्चिम) लिंक रोड येथे एका राजकीय पक्षाच्या सदस्यांनी समाजसेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्याला मारहाण केल्याबाबत

**(४) २००९७ (०४-०८-२०२३) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील खार (पश्चिम) लिंक रोड येथे असलेल्या रेडीओ बारमध्ये दिनांक १ मे,२०२३ रोजी पोलिसांनी टाकलेल्या छाप्यामध्ये पहाटे साडेतीन वाजेपर्यंत ग्राहक दारु पित असल्याचे व मोठ्या आवाजात डी.जे लावून त्यांवर अश्लिल नृत्य करीत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा प्रकार बंद करण्याबाबत एका समाज सेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी बार मालकाला विनंती केली असता, त्या बारमध्ये मद्य प्राशन करीत असलेल्या एका राजकीय पक्षाच्या सदस्यांनी त्यांना मारहण केली, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या समाजसेवकाने पोलिसांना पाचारण केले असता पोलिसांनी बार बंद करण्याबाबत सांगितले असता एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने पोलिसांना शिवीगाळ करुन मारहाण केली, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** १) हे खरे नाही,

सदर घटना दिनांक ०१/०५/२०२३ रोजीची नसून, दिनांक २९/३०/०४/२०२३ रोजीची आहे. मुंबईतील खार (पश्चिम) लिंक रोड येथील रेडीओ बार विहित वेळेपेक्षा जास्त वेळ चालू होता.सदरहू आस्थापनेत इतर कोणतेही प्रकार घडलेले नाहीत. आस्थापनेचे सहायक व्यवस्थापक यांचेवर महाराष्ट्र

पोलीस कायद्यान्वये कारवाई करून रुपये १२,५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
२), ३) व ४) समाज सेवी संस्थेच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांस मारहाण तसेच, पोलिसांना शिवीगाळ करुन मारहाण झाल्याबाबत चौकशीत आढळून आलेले नाही.
५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील बोरीवली येथील खाजगी संस्थेने सुमारे दीड हजार संस्थांना बेकायदा शासकीय मान्यता दिल्याबाबत

**(५) २०७४१ (०८-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बोरिवली येथील एका खाजगी संस्थेने शासनाची परवानगी असल्याचे भासवून सुमारे दीड हजार संस्थाना कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाची मान्यता दिली असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दीड हजार संस्थानी हजारो तरुणांना बेकायदा प्रशिक्षण देत शासनाची बोधचिन्ह असलेली प्रमाणपत्र दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सदर दीड हजार संस्थांची फसवणूक करणाऱ्या उक्त संस्थेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (३०-०५-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर संस्थेविरुध्द कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, बोरीवली येथे संबंधित “Educational Board of Vocational Training & Research या संस्थेविरुध्द दिनांक २५/०३/२०२३ रोजी तक्रार /एफ.आय.आर क्र. ०२२४ दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## सार्वजनिक आरोग्य विभागात वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याबाबत

**(६) २१०४७ (०५-०१-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये औषधांच्या कमतरतेबरोबरच उपचारांसाठी डॉक्टरांची व परिचारिकांची मोठ्या प्रमाणात कमतरता असून २ संचालक, ४ अतिरिक्त संचालक, ५ सहसंचालक, २३ उपसंचालक या प्रमुख पदांसह जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील १२१, जिल्हा शल्यिचिकित्सक संवर्गातील ३३८, तज्ञ डॉक्टरांची ४७९, "अ" श्रेणीतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची ९८३ तर "ब" श्रेणीतील २३८ पदे बऱ्याच कालावधीपासून रिक्त असल्याचे दिनांक १६ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागातील विभागिय पदोन्नती समिती असूनही अनेक वर्षांपासून कनिष्ठ व वरिष्ठ अधिकारी पदोन्नतीपासून वंचित राहिल्याचे व त्यामुळे कनिष्ठांना पदभार दिला जात नसल्याचे तसेच आरोग्य विभागात असलेल्या रिक्त पदामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने अनेकवेळा रुग्णांना आपला जीव गमवावा लागत असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार विभागिय पदोन्नती समितीस आदेश देऊन पात्र अधिकाऱ्यांना तातडीने पदोन्नती देण्याबाबत तसेच सदरील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२२-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कंत्राटी निदेशक पदांना नियमित करणेबाबत

**(७) २१०९७ (०५-०१-२०२४) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कंत्राटी तत्वावर मान्यता दिलेल्या ३२६ पदांना नियमित पदे म्हणून मान्यता देवुन त्यावरील कार्यरत शिक्षकांना नियमित वेतनश्रेणीत मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,कंत्राटी निदेशकांच्या मानधनात ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनास्तरावर कार्यरत शिक्षकांना नियमित वेतनश्रेणीत मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१३-०६-२०२४) :** १), २), ३) व ४) दिनांक १४ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील दुसरी व

तिसरी पाळीतील व उर्वरित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरु करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या सद्य:स्थितीतील कार्यरत २९७ कंत्राटी निदेशकांचे दिनांक १४/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये नियमित शासन सेवेत समायोजन करण्यात आले आहे.

---

## आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तकांना स्मार्ट फोन, रिचार्जची पुरेशी रक्कम, योग्य मोबदला व मराठी ॲप उपलब्ध करुन देण्याच्या मागणीबाबत

**(८) २१२०४ (०५-०१-२०२४) श्री.अरुण लाड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तकांना स्मार्ट फोन, रिचार्जची पुरेशी रक्कम, योग्य मोबदला व मराठी ॲप उपलब्ध करुन देण्याच्या मागणीसाठी कोल्हापूर जिल्हा आशा वर्कर व गट प्रवर्तक युनियनच्या वतीने कोल्हापूर जिल्हा परिषदेसमोर दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शने करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आशा स्वयं सेविकांत व गटप्रवर्तक यांना त्यांनी केलेल्या कामांवर आधारित मोबदला शासनाने मंजूर केला आहे, शासनाने दिलेल्या सूचनानुसार साधारणपणे ७२ हेडवर आशा स्वंय सेविकांना कामे करावी लागतात त्यानुसार त्यांना मानधन देय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आशा स्वंय सेविकांना ऑनलाईन कामांसह इतर कामाची सक्ती करण्यात येत असल्यामुळे आशा सेविकांना व गटप्रवर्तकांना स्मार्ट फोन तसेंच रिचार्जची पुरेशी रक्कम व योग्य मोबदला व मराठी ॲप उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३)केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आशा स्वयंसेविकांना ऑनलाईन कामे करणेऐवजी कामावर आधारित मोबदला अदा करण्यात येत आहे. PMJAY कार्ड काढणेसाठी रुपये ५/- व लाभार्थ्यांना कार्ड वितरीत करणेसाठी रुपये ३/- असे एकत्रित रुपये ८/-प्रति कार्ड मानधन देण्यात येत आहे.आभाकार्ड काढणेसाठी रुपये १०/- प्रति कार्ड मानधन अदा करण्यात येत आहे. NCD पोर्टल मध्ये CBAC फॉर्म भरणेसाठी प्रति फॉर्म रुपये १०/- मानधन अदा करण्यात येत आहे. तसेच दिनांक ०१/११/२०२३ च्या पत्रान्वये आशा स्वयंसेविकांना ऑनलाईन कामांसाठी मार्गदर्शन करणेबाबत जिल्हा व मनपा स्तरावर सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सन २०२४-२६ च्या प्रस्तावित प्रकल्प अमंलबजावणी आराखड्यामध्ये आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना स्मार्टफोन उपलब्ध करून देणेसाठी व मोबाईल भत्त्यामध्ये वाढ लागु होणेसाठी निधी

प्रस्तावित करण्यात आला आहे. आशांना केंद्र व राज्य शासन एकत्रित निधी रुपये ८०००/- मासिक अदा करण्यात येत आहे. तसेच या व्यतिरिक्त इतर बाबींवरील कामावर आधारित मोबदला अदा करण्यात येत असून रुपये १०००० ते रुपये १२००० पर्यंत मासिक कामावर आधारित मोबदला आशांना अदा करण्यात येत आहे. गटप्रवर्तक हे क्षेत्रिय भेटी या तत्वावर नियुक्त करण्यात येतात, केंद्रशासनाचे रुपये ८७७५/- व राज्य शासनाचे रुपये ७२००/- असे एकत्रित रुपये १५९७५/- मासिक मानधन अदा करण्यात येते. आशा स्वयंसेविकांना योग्य मोबदला मिळणेसाठी दिनांक ११/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनस्तरावर कळविण्यात आले आहे. PMJAY कार्ड काढणेसाठी उपलब्ध ॲप्लीकेशनमध्ये मराठी भाषा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अनाथ आणि विधी संघर्षित बालकांना सांभाळणाऱ्या संस्थांना परिपोषणाचा खर्च मिळणेबाबत

**(९) २१२२० (०५-०१-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनाथ आणि विधी संघर्षित बालकांना सांभाळणाऱ्या ४० संस्था असून या संस्थांना १८ महिन्यांपासून परिपोषणाचा खर्च शासनाने दिला नसल्यामुळे सदर संस्था आर्थिक अडचणीमध्ये असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्था कर्ज काढून संस्थेतील लहान मुलांच्या भोजनाची व्यवस्था करीत असून काही संस्था देणगीदारांकडे देणगी मिळण्याकरीता प्रतिक्षेत असल्याने काही संस्थेतील अनाथ मुलांना उपाशीपोटी रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संस्थांना परिपोषणाचा खर्च त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१७-०५-२०२४) :** १) व २) हे खरे नाही,
शासन निर्णय दिनांक ९/०५/२०२३ अन्वये मिशन वात्सल्य योजनेंतर्गत बाल काळजी व संरक्षणाशी संबंधित संस्थेतील प्रवेशितांच्या परिपोषणासाठी अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
३) मिशन वात्सल्य योजनेंतर्गत कार्यरत संस्थांना परिपोषण अनुदान वितरणामधील तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या असून अनुदान वितरणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आली आहे. तद्नंतर परिपोषण अनुदानाची रक्कम अदा करण्यात आली आहे.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाडी व शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीत दिरंगाई होत असल्याबाबत

**(१०) २१२८० (०५-०१-२०२४) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २२ जिल्ह्यातील अंगणवाडी व शालेय विद्यार्थांच्या आरोग्य तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची सेवा बंद पडली असून विद्यार्थी आजारी पडल्यास जिल्ह्याच्या ठिकाणी उपचारासाठी घेऊन जायला शासकीय वाहन उपलब्ध नसल्याची व सन २०१९ मध्ये वाहन पुरविण्याचा ठेका देण्यात आलेल्या नाशिकच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार संस्था व महाराष्ट्र विकास समूह या दोन्ही समुहांनी राज्यातील २२ जिल्ह्यात सुमारे ७०० वाहने पुरविण्यासाठी तयारी दाखविली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ३ वर्षात इंधनाचे दर शंभरीवर गेल्यानंतर शासनाने दर वाढवून देण्यासाठीचा निर्णय सातत्याने पुढे ढकलल्याने कंत्राटदारानी दिनांक १ जून, २०२३ पासून वाहन सेवा थांबविली असून शासनाने काही जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दरानुसार वाहनांसाठी निविदा मागविल्या परंतु दर परवडणारे नसल्याने निविदेला योग्य प्रतिसाद मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थांच्या सुदृढ आरोग्याच्या दृष्टीने सदरहू बंद पडलेली वाहनांची व्यवस्था तातडीने सुरू करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

आरबीएसके कार्यक्रमांतर्गत २२ जिल्ह्यातील आरबीएसके पथकांसाठी मे.महाराष्ट्र विकास ग्रुप व मे.श्री.छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था ली. या संस्थेद्वारे T-Permit वाहन सेवा मे २०२३ पर्यंत पुरविण्यात येत होती. सदर दोन्ही संस्थांनी मुदतवाढ कालावधीमध्ये निविदेच्या मान्यता प्राप्त दरानुसार दिनांक १ जून, २०२३ पासून काम करण्यात नकार दर्शविला. यामुळे राज्यस्तरावर निविदा प्रक्रिया होईपर्यंत सदरहू प्रकरणी कामात व्यत्यय होऊ नये म्हणून जिल्हास्तरावरून तात्पुरत्या स्वरूपात T-Permit वाहने RTO च्या प्रती किलोमीटरच्या दराने आरबीएसके आरोग्य पथकांच्या दळणवळणासाठी घेण्यात यावीत असे जिल्हयांना पत्राद्वारे कळविण्यात आले असून सदर २२ जिल्ह्यामध्ये अंगणवाडी व विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी वाहनांची सेवा सुरू ठेवण्याची उपाययोजना करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यस्तरावर निविदा प्रक्रिया होईपर्यंत सदरहू प्रकरणी कामात व्यत्यय होऊ नये म्हणून जिल्हास्तरावरून तात्पुरत्या स्वरूपात T-Permit वाहने RTO च्या प्रती किलोमीटरच्या दराने आरबीएसके आरोग्य पथकांच्या दळणवळणासाठी घेण्यात यावीत असे २२ जिल्हयांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

(३) २२ जिल्हयांपैकी १५ जिल्हयांमध्ये सद्य:स्थितीत कार्यरत असणाऱ्या ७ आरबीएसके वाहन सेवा पुरवठादारांना नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आरबीएसके वाहने पुरवण्याबाबतचे दिनांक ७ नोव्हेंबर २०२३ रोजी आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील अंगणवाडी व शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची सेवा सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिमणे, (ता.आजारा, जि कोल्हापूर) येथील घरकुल योजनेबाबत

**(११) २१२८४ (१९-०४-२०२४) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमणे, ता.आजरा, जि.कोल्हापूर येथील सन २०१६ मध्ये घरकुल योजनेच्या मंजुरीकरीता पाठविण्यात आलेल्या अर्जापैकी केवळ १२ अर्जाना मंजूरी मिळाल्याचे तसेच सदर मंजूर १२ घरकुलाना अद्यापपर्यंत अनुदानाची रक्कम मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित अर्ज नाकारण्यामध्ये कोणते निकष लावण्यात आले आहेत व याबाबत संबंधिताना योग्य ती माहिती देण्यात आली आहे काय,सदरहू गावातील आतापर्यंत किती अर्ज प्राप्त झाले व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली

(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने सदर १२ घरकुलाना अनुदानाची रक्कम प्राप्त होण्याकरीता शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रपत्र-ड यादीचे ऑनलाइन सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यामध्ये एकूण ४५ लाभार्थ्यांपैकी १० लाभार्थी पात्र झाले असून उर्वरित ३५ लाभार्थी ऑनलाइन सिस्टीम मधून अपात्र झाले आहेत. या संदर्भात संबंधितांना माहिती देण्यात आली आहे.

राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रपत्र-ड मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांपैकी पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरीता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांना दिनांक १४/०१/२०२२ व दिनांक ०६/०७/२०२३ च्या पत्रान्वये सादर केला आहे. परंतु या संदर्भात केंद्रशासनाचे मार्गदर्शन अद्याप अप्राप्त आहे.

(३) केंद्रशासनाकडून अद्यापर्यंत उद्दिष्ट प्राप्त न झाल्यामुळे सदर १० पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करता आले नाही व त्यामुळे अनुदानाची रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीमधील टाईम टेक्नोप्लास्ट या कंपनीतील कामगारांनी केलेल्या उपोषणाबाबत

**(१२) २१५७० (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीमधील टाईम टेक्नोप्लास्ट ही कंपनी व्यवस्थापनाकडून मान्य केलेल्या अटीनुसार कामगारांना थकबाकी दिली जात नसल्याने कामगार कंपनी प्रशासनाच्या विरोधात कंपनीबाहेर ३९ कुटुंबियांसमवेत उपोषण करीत असून त्यातील दोन कामगारांची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांना वैद्यकीय उपचारासाठी हलविण्यात आले असल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये

वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपनी प्रशासनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच कामगारांना थ्ाकबाकी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे

या विषयासंदर्भात माझे समक्ष दिनांक १७/१०/२०२३ रोजी सर्व संबंधितांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीमध्ये कामगारांना केलेल्या आवाहनानुसार कामगारांनी दिनांक १८/१०/२०२३ पासून उपोषण स्थगित केले होते.
(२) कामगार व व्यवस्थापन यांचेमध्ये दिनांक २८/०२/२०२४ रोजी झालेल्या समझोत्यानुसार व्यवस्थापनाकडून एकूण ३८ कामगारांना प्रति कामगार रुपये ४ लाख एवढी अंतिम कायदेशीर देणी अदा करण्यात आली आहेत. त्यानुसार कामगारांनी राजीनामा देवून अंतिम कायदेशीर देणी स्विकारली आहेत. उर्वरित १ कामगार बदलीचे ठिकाणी (दमण) येथे रूजू झाला असल्याने कामगार व व्यवस्थापन यांच्यामध्ये उद्भवलेला औद्योगिक विवाद संपुष्टात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## पेसा भरती न झाल्याने आदिवासी बांधवांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन केले असल्याबाबत

**(१३) २१७९१ (०५-०१-२०२४) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन जवळपास दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही अद्याप पेसा भरती न झाल्याने पालघर जिल्ह्यातील हजारो आदिवासी बांधव रोजगाराविना बेकार असल्याने आदिवासी बांधवांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन केले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास पालघर जिल्ह्यातील पेसाभरती तात्काळ करून आदिवासी बांधवांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२६-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गाची शिक्षण सेवक पदाची भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरू असताना TAIT परीक्षा पात्र उमेदवारांनी दिनांक ०६/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये आंदोलन सुरू करणेबाबत कळविले होते.
(२) शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत पवित्र पोर्टलद्वारे सप्टेंबर, २०१९ मध्ये शिक्षण सेवकांची भरती करण्यात आली आहे. सदर भरती प्रक्रियेद्वारे पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गाची शिक्षण सेवकांची भरती करण्यात आलेली आहे. सदर भरती प्रक्रियेतील सद्य:स्थितीमध्ये एकूण

१३२ प्राथमिक शिक्षक कार्यरत आहेत. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक १/१२/२०१८ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील आश्रमशाळांमधील सरळसेवेची शिक्षक व अधीक्षक (पुरुष) व इतर संवर्गांची रिक्त पदे भरणेकरीता विशेष भरती प्रक्रिया राबविण्यास मंजूर देण्यात आली होती. ठाणे विभागांतर्गत भरतीप्रक्रिया महाऑनलाईन, मुंबई यांचेमार्फत राबविण्यात आली. शासकीय आश्रमशाळेत तासिका, रोजंदारी तत्वावर काम करीत असलेल्या उमेदवारांच्या अनुभवाबाबत प्राप्त प्रमाणपत्रानुसार गुणदान करुन पालघर जिल्ह्यात विशेष पेसा भरती प्रक्रीया सन २०१८ अंतर्गत शिक्षक व इतर संवर्गात २६२ उमेदवारांना पालघर जिल्ह्यात नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. महसूल विभागांतर्गत तलाठी संवर्गात दिनांक ७/०२/२०२० रोजीच्या आदेशान्वये पेसा क्षेत्रातील १ उमेदवाराची भरती करण्यात आली आहे. पेसा क्षेत्रात विहित १७ संवर्गांबाबत निर्गमित मा.राज्यपाल महोदय यांची अधिसूचना व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णयास अनुसरून दिनांक ०५/०८/२०२३ रोजी पालघर जिल्हा परिषद अंतर्गत पदभरतीची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, सदर अधिसूचना व शासन निर्णय यांना मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हानित करण्यात आले आहे. यानंतर सामान्य प्रशासन विभागाने पेसा क्षेत्रातील विहित संवर्गांच्या निवड प्रक्रिया/ नियुक्ती संदर्भात कोणतीही कार्यवाही करु नये असे निर्देश दिले आहेत. सबब, गृह विभागातील पोलीस पाटील संवर्ग, महसूल विभागातील तलाठी, कोतवाल संवर्ग, ग्रामविकास विभाग अंतर्गत आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, अंगणवाडी पर्यवेक्षिका, कंत्राटी ग्रामसेवक व पशुधन पर्यवेक्षक या संवर्गांची पदभरती प्रक्रिया मा.सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत थांबविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आयटीनगरी (जि.पुणे) परिसरातील सर्व प्रमुख रस्त्यांची खडड्यांमुळे दुरवस्था झाल्याबाबत.

**(१४) २१९९५ (०५-०१-२०२४) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे परिसरातील (हिंजेवाडी) आयटीनगरी मधील प्रमुख रस्त्यांची खडड्यांमुळे मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाल्याचे माहे ऑक्टोंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदरहू रस्त्यांपैकी बहुतांश रस्ते हे एमआयडीसी प्रशासनाच्या अधिकार कक्षात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची पाहणी करुन आयटीनगरी परिसरातील प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.उदय सामंत (१२-०६-२०२४) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

(२) राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्रमांक १,२, व ३ मधील रस्त्यावर पडलेले खड्डे वेळोवेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून निविदा काढून कंत्राटदाराकडून भरुन रस्ते दुरुस्त करण्यात आले आहेत.

• करारनामा क्र.बी-१/८ सन २०२३-२४ या निविदेव्दारे, राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र.१

मधील खड्डे बुजविण्याचे काम चालू आहे.

• करारनामा क्र.बी-१/१० सन २०२३-२४ या निविदेव्दारे, राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र.२ मधील खड्डे बुजविण्यात आलेले आहेत.

• करारनामा क्र.बी-१/११ सन २०२३-२४ या निविदेव्दारे, राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र.३ मधील खड्डे खड्डे बुजविण्याचे काम चालू आहे.

तसेच राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र.१,२ व ३ मधील रस्त्यालगत मेट्रोचे काम सुरु असून, त्यामुळे खराब होणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सार्वजनिक आरोग्य खात्यामधील रिक्त पदांच्या जागा भरण्याबाबत

**(१५) २२२६३ (०५-०१-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने रिक्त जागांसाठी आरोग्य खात्यातील "क" आणि "ड" श्रेणीतील १२ हजार पदे भरण्याचा निर्णय दिनांक १९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला असून सदर रिक्त पदे राज्य लोकसेवा आयोग, राज्य निवड मंडळ आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्यामार्फत भरण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे, नांदेड,नागपूर,पुणे, छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांचे झालेले मृत्यू लक्षात घेता शासनाने रिक्त पदे भरण्याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागातील गट क व ड श्रेणीतील एकूण १०९४९ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी दिनांक २८/०८/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदे भरण्यासाठी टीसीएस/ आयओएन या कंपनीची निवड करण्यात आली होती.

(२) गट- 'क' व गट 'ड' संवर्गाच्या पदभरती परीक्षेतून गुणवत्ताधारक ठरलेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत रिक्त पदावरील समायोजनबाबत

**(१६) २२६१० (०५-०१-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील १५ वर्षापासून अतिशय तुटपुंज्या मानधनावर खेडोपाडी व शहरात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी आरोग्य सेविका, सहाय्यिका प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधी निर्माण अधिकारी,

वैद्यकीय अधिकारी इत्यादी संवर्गात कंत्राटी कर्मचारी आरोग्य सेवा देत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करुन वेतन वाढीबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मा.आरोग्य मंत्री यांनी माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन व न त्यांच्या वेतनवाढीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
कंत्राटी कर्मचारी यांना शासनसेवेत नियमित पदावर थेट समायोजन करण्यासाठी सदर तांत्रिक व अतांत्रिक पदांच्या समकक्ष असलेल्या पदांच्या सेवा प्रवेशनियमात सुधारणा करणेबाबत आदेश देण्यात आले असून वेतन वाढीबाबत निर्णय घेण्याबाबत कुठलेही आश्वासन दिलेले नाही.
(३) कंत्राटी कर्मचारी यांचे समायोजनाबाबत दिनांक १४/०३/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळेगाव-दाभाडे (जि.पुणे) येथील जनरल मोटर्सच्या बंद झालेल्या प्रकल्पातील कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) २२६८५ (१९-०४-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव-दाभाडे (जि.पुणे) येथील जनरल मोटर्सच्या बंद झालेल्या प्रकल्पातील कामगारांना हा प्रकल्प घेणाऱ्या ह्युंदाई कंपनीकडे रोजगार संधीसाठी पाठपुरावा केला जाईल असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी या कामगाराच्या शिष्टमंडळाला नुकतेच दिले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनरल मोटरचा हा प्रकल्प ह्युंदाई कंपनीने खरेदी केला असून यातील कामगारांनी जनरल मोटर्सने समाधानकारक भरपाई द्यावी तसेच काही कामगारांना ह्युंदाई कंपनीने सेवेत सामावून घ्यावे अशा सूचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी या कंपनीचे व्यवस्थापनाला दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलांबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१९-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/१०/२०२३ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत कामगारांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे राहील, असे सांगण्यात आले.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

जनरल मोटर्स इंडिया प्रा.लि., तळेगांव, पुणे या आस्थापनेत एकूण १५७६ कायम कामगार काम करीत होते. त्यापैकी ५५५ कामगारांनी पुर्वीच स्वेच्छा निवृत्ती घेतली होती. सदर आस्थापनेस दिनांक ०५/०७/२०२३ रोजी कंपनी बंद करण्यास दिलेल्या मंजूरी आदेशानंतर नव्याने १४१ कामगारांनी स्वेच्छानिवृत्तीचा (VRS Package) चा लाभ घेतला आहे. परंतु, उर्वरित ८८० कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्विकारण्यास नकार दिला होता. त्यानंतर शासन स्तरावरून व्यवस्थापनाबरोबर वारंवार चर्चा करून कामगारांना स्वेच्छानिवृत्तीची रक्कम देण्याबाबत आग्रही भुमिका घेतली. व्यवस्थापनाने शासनाच्या भुमिकेचा आदर करत सुमारे २०० कोटी रूपयांच्या स्वेच्छानिवृत्ती रक्कमेचे वाटप कामगारांना करण्याचे मान्य केले. त्यानुसार कामगार संघटना व व्यवस्थापन यांच्यामध्ये दिनांक १२/०२/२०२४ रोजी सामंज्यस करार झालेला आहे व त्यानुसार ८७१ कामगारांना करारामध्ये ठरल्याप्रमाणे रक्कम वाटप करण्यात आलेली आहे. तथापि, ९ कामगारांना रक्कम वाटप करणे बाकी आहे.

तसेच, जनरल मोटर्स इंडिया प्रा.लि. या आस्थापनेच्या ठिकाणी येणाऱ्या नवीन कंपनीमध्ये सदर कामगारांना प्राधान्याने काम उपलब्ध करून देण्यासंदर्भात व्यवस्थापनाने नवीन कंपनीला विनंती करावी, असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी कंपनी व्यवस्थापनाला दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या कामाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१८) २२६९६ (१९-०४-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत सुरू असलेल्या कामाचे प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू असून त्या अनुषंगाने सन २०२३ ते २०२४ व्या वर्षात वैयक्तिक शौचालय बांधकाम, सार्वजनिक शौचालय बांधकाम या घटकांसोबतच व्यवस्थापन सांडपाणी व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापन, गोबरधन प्रकल्प, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन या घटकांची प्रभावी अंमलबजावणी व या अभियानाला गतिमानता प्राप्त करून देण्यासाठी माहे मार्च, २०२४ अखेरीस राज्य हागणदारीमुक्त प्लस म्हणून घोषित करण्याचे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत विविध विषयाच्या अनुषंगाने मा.मंत्री महोदयांनी आढावा घेतला असून वैयक्तिक लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मदतीत वाढ करून हागणदारी मुक्त प्लस ची योजना पूर्ण करण्याबाबत काय कार्यवाही केली

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२५-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वे व सूचनांनुसार वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांना रुपये १२०००/- इतके प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण

झाल्यानंतर लाभार्थ्यांना देण्यात येत असलेल्या प्रोत्साहन अनुदानामध्ये केंद्र शासनाने सद्यःस्थितीत कोणतीही वाढ केलेली नसल्यामुळे पूर्वीप्रमाणेच रुपये १२०००/- इतकेच प्रोत्साहन अनुदान देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुभवी तासिका तत्त्वावरील निदेशकांना कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेबाबत

**(१९) २२७४१ (०५-०१-२०२४) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सुमारे ३ हजार तासिका निदेशक अत्यंत अल्प मानधनात व्यवसाय प्रशिक्षण देण्याचे काम करीत असून शासकीय सेवेत काम केल्याचे साधे अनुभव प्रमाणपत्र देखील या निदेशकांना देण्यात येत नसल्यामुळे कोणत्याही ठिकाणी काम करू शकत नाही म्हणून उदरनिर्वाह करणे कठीण होत असल्याने अनुभवी तासिका निदेशकांना कंत्राटी पध्दतीने सामावून घेण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुभवी तासिका तत्त्वावरील निदेशकांना तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१३-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक १४ डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील तासिका निदेशकांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेबाबत मागणीच्या अनुषंगाने संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

---

## राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या उपदान व निवृत्तीवेतनाबाबतच्या ग्रामविकास विभागाच्या अधिसूचनेबाबत

**(२०) २२७९४ (१९-०४-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणारे उपदान व पेन्शनबाबत ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ७ ऑगस्ट २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेमध्ये जे कर्मचारी केंद्राप्रमाणे उपदान घेतील त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवानिवृत्ती सेवाशर्ती १९८२ लागू राहणार नाही असा मसुदा प्रसिध्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिसूचनेमुळे जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान किंवा पेन्शन बंद होणार असल्याने त्यांच्यावर अन्याय होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून ग्रामविकास विभागाची दिनांक ७ ऑगस्ट २०२३ रोजीची अधिसूचना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (३०-०५-२०२४) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) शासनाने दिनांक ७/८/२०२३ रोजीची अधिसूचनेचे प्रारुप प्रसिध्द केले असून त्यावर जिल्हा परिषद कर्मचारी यांचेकडून हरकती/सूचना मागविण्यात आल्या आहेत. प्राप्त हरकती/सूचना विचारात घेवून अंतिम निर्णय घेण्यात येईल.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.